# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.**

दूरध्वनी क्रमांक : (कार्यालय) ०२०-२५६५९४६५, २५६५८१३३ ई-मेल : director@ebalbharati.in


## पाठ्यपुस्तक मंडळ, 'बालभारती', पुणे यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांच्या सेवा विविध पाठ्यपुस्तकांच्या निर्मिती विषयक कामकाजासाठी सेवाकरार पध्दतीने नियुक्ती देणेबाबत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी करणेसाठी पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे या कार्यालयात **'विशेषाधिकारी (इंग्रजी, सिंधी, भूगोल, शास्त्र, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण, गणित, इतिहास व राज्यशास्त्र)' व 'सहायक विशेषाधिकारी (मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलुगु, कन्नड, उर्दू, गुजराती, गणित, भूगोल, शास्त्र)'** या पदांचे कामांसाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३, दिनांक ०८ सप्टेंबर २०२३ नुसार शासकीय/निमशासकीय/शासन मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालय/महाविद्यालयातील आस्थापनेवरून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घ्यावयाच्या आहेत. या विषयाची माहिती पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in या संकेतस्थळावर करण्यात आली आहे.

| अ.क्र. | नामिका सूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तींची संख्या | कामाचे स्वरूप | देय मासिक पारिश्रामिक |
|---|---|---|---|
| १. | **विशेषाधिकारी – ८ पदे** (इंग्रजी, सिंधी, भूगोल, शास्त्र, कार्यानुभव, गणित, आरोग्य व शारीरिक शिक्षण, इतिहास व राज्यशास्त्र) | राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पाठ्यपुस्तक व पाठ्येत्तर साहित्य तयार करणे | दिनांक १७ डिसेंबर २०१६ व दिनांक ०८ सप्टेंबर २०२३ च्या शासन आदेशानुसार |
| २. | **सहायक विशेषाधिकारी – १० पदे** (मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलुगु, कन्नड, उर्दू, गुजराती, गणित, भूगोल, शास्त्र) | राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पाठ्यपुस्तक व पाठ्येत्तर साहित्य तयार करणेसाठी विशेषाधिकारी यांना मदत करणे | |

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| १. | विशेषाधिकारी (८ पदे) | i. मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधीत विषयातील पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ii. मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पदवी (B.Ed.) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>iii. शासकीय/निमशासकीय/शासन मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील पूर्ण वेळ पदावर अध्यापनाचा किंवा शासन अंगीकृत पाठ्यपुस्तक निर्मिती संस्थेमध्ये लेखन/संपादन/संशोधन याचा किंवा महाविद्यालय / अध्यापक महाविद्यालयातील पूर्ण वेळ नियुक्तीनंतर सलग ५ वर्षे अध्यापनाचे काम केल्याचा अनुभव. |
| २. | सहायक विशेषाधिकारी (१० पदे) | i. मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधीत विषयातील पदव्युत्तर पदवी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ii. मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पदवी (B.Ed.) आवश्यक.<br>iii. शासकीय/निमशासकीय/शासन मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील पूर्ण वेळ पदावर अध्यापनाचा किंवा शासन अंगीकृत पाठ्यपुस्तक निर्मिती संस्थेमध्ये लेखन/संपादन/संशोधन याचा किंवा महाविद्यालय / अध्यापक महाविद्यालयातील पूर्ण वेळ नियुक्तीनंतर सलग ३ वर्षे अध्यापनाचे काम केल्याचा अनुभव. |

तरी इच्छुक उमेदवारांनी पाठ्यपुस्तक मंडळाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्द केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंन्ट काढून अर्ज अचुक भरून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह बंद पाकीटाच्या वरील बाजूस विषय नमूद करून संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ०४ यांचे नांवे समक्ष व पोस्टाने अंतिम मुदत दिनांक ०८.०५.२०२५ पर्यंत सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सर्व पदांवर नियुक्ती करावयाची किंवा नाही याचा अधिकार मंडळास राहील.

**क्रमांक : १०७२**
**दिनांक : ३०.०४.२०२५**

**(कृष्णकुमार पाटील)**
संचालक,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ०४.